


Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded



16) Medicinal plants used for the treatment of Ear problems by rural and tribal .....
Eanguwar Srinivas Reddy, Shivraj Kashinath Bembrekar(M.S) || 64

17) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही
सूर्यवंशी राजेंद्र हिरामण, जि.लातूर || 68

18) बंजारा जमातीचा इतिहास
फड ज्ञानोबा दशरथ || 70

19) पं. जवाहरलाल नेहरूंचे वाचन
डॉ. घ. ना. पांचाळ, जि. परभणी || 72

20) सुफी संत परंपरा आणि धर्म
सचिन गुंडीराम डेंगळे, जि. लातूर || 73

21) भूयुद्धनिती किंवा भूसामरिकता (Geostrategy)
प्रा. डॉ. संजय प्रभाकर ढाके., जि. धुळे || 76

22) महाविद्यालयीन युवक-युवतींचा पर्यावरणविषयी जाणीवेचा अभ्यास
डॉ. एस. जे. शेख, चोपडा || 79

23) दया पवार यांची कविता : एक आकलन
प्रा. विठ्ठल भानुसे, जि. बुलडाणा || 81

24) लातूर जिल्हयातील साक्षरता एक भौगोलिक आवलोकन
प्रा.डॉ.जनार्धन केशवराव वाघमारे, जि.लातूर || 85

25) भारतातील महिला सबलीकरण चळवळी : एक समीक्षणात्मक विश्लेषण
प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव, जि.नांदेड || 87

26) अलग-अलग वैतरणी में जीवन मूल्य संक्रमण
प्रा. अशोक डी. तायडे, जि. नंदुरबार || 96

27) भ्रष्टाचार एक समस्या : कारण एवं समाधान
डॉ. सन्जू सजवाण नेगी, बादशाहीथौल (टि.ग.) || 98

28) हिन्दी साहित्य और वैश्विक चेतना
डॉ. राजेश कुमार सिंह, वृंदावन मथुरा || 101

29) भीष्म साहनी की प्रासंगिकता
रणजीत कुमार सिन्हा, पश्चिम मेदिनीपुर || 103

30) भूमण्डलीकरण के दौर में विद्यालयी शिक्षा व्यवस्था में परिवर्तन
डॉ. रूक्मिणी चौधरी, गोरखपुर || 106

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned by CamScanner

दिले जात नाही. म्हणून लातूर जिल्ह्यात पुरूषापेक्षा स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते.

निष्कर्ष :

लातूर जिल्ह्यातील साक्षरतेचा अभ्यासकेल्यानंतर असे निदर्शनास आले की, लातूर, उदगीर, अहमदपूर, चाकूर, शिरूर अनंतपाळ या तालुक्यात साक्षरता ७७ टक्के पेक्षा अधिक असून जळकोट देवणी, रेणापूर, निलंगा, औसा या तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण कमी म्हणजेच ७५ टक्के पर्यंत आहे. पुरूष साक्षरतेचा विचार करता सर्वात अधिक म्हणजे ८६ टक्के पेक्षा जास्त साक्षरता लातूर तालूक्यात असून त्या खालोखाल उदगीर, अहमदपूर, चाकूर, शिरूर अनंतपाळ या तालुक्यात आहे तर सर्वात कमी साक्षरता औसा, तालूक्यात

असून त्या खालोखाल देवणी, जळकोट, निलंगा, रेणापूर या तालुक्यात ८६ टक्के पैक्षा कमी साक्षरता आहे. तसेच स्त्री साक्षरतेचा विचार करता सर्वाधिक साक्षरता लातूर तालुक्यात असून त्या खालोखाल उदगीर तालुका तर सर्वात कमी स्त्री साक्षरता जळकोट तालुक्यात आहे. स्त्री-पुरूष साक्षरतेची तुलना करता स्त्री साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी आहे. साक्षतेचे प्रमाण शहरी भागात अधिक तर ग्रामिन भागात असल्याचे दिसुन येते.शहरी भागाच्या तुलनेत ग्रामिन भागात शिक्षणाच्या सुविधा व जागृती कमी आहे.

उपाययोजना :

लातूर जिल्ह्यातील साक्षरतेचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की नवीन तालुक्यात म्हणजेच जळकोट तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी आहे ते वाढण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. स्त्री-पुरूष साक्षरतेची तुलना केल्यानंतर पुरूषापेक्षा स्त्रीयांची साक्षरता अत्यंत कमी आहे. ती पुरूषाच्या बरोबरीने वाढवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. साक्षरतेचे प्रमाण वाढवण्यासाठी सर्वात महत्त्वाची उपाययोजना म्हणजे पालकांना शिक्षणासाठी सजग करावे, मुलामुलीत भेद होणार नाही. याची काळजी घ्यावी. मुलगा आणि मुलगी सारखेच आहेत. हे लोकांना पटवून द्यावे. ग्रामीण भागात शिक्षकांची संख्या पुरेशी नाही ती वाढवणे अत्यंत आवश्यक आहे.

संदर्भ :


१. डॉ.एन.के.वाघमारे यांचा पीएच.डी. प्रबंध
२. लोकसंख्या भूगोल
३. २०११चा लोकसंख्या सेनसेस
४. लातूर जिल्हा आर्थिक व सामाजिक समायोजन २०१२-१३.
५. वेबसाइड


□□□

**25**

# भारतातील महिला सबलीकरण चळवळी : एक समीक्षणात्मक विश्लेषण


प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय,देगलूर, ता.देगलूर जि.नांदेड


**********

प्रस्तावना :

वर्तमान भारतात अनेक विषयावर सामाजिक चळवळी उदयास येत आहेत. ज्यात प्रामुख्याने पर्यावरण, मानवी हक्क, वंचितांच्या समस्या, असंघटितांचे प्रश्न,स्त्रिवाद,दहशतवाद, शिक्षण, रोजगार पाणी ई. संशोधनात्मक सर्वसाधारणपणे स्त्रिप्रश्नासाठी लढणाऱ्या सामाजिक संघटना आपल्या लढयाला महिला सबलीकरण या सदराखाली समाज,शासन,प्रशासन व प्रसार माध्यमासमोर मांडत असतात. स्त्रिप्रश्नांविषयी लिहिणारे अभ्यासक मग ते स्त्री किंवा पुरुष असोत स्त्रीवाद या शिर्षकाअंतर्गत आपल्या चिंतनास अभिव्यक्त करतात. तर काही अभ्यासक, सामाजिक संघटना व बऱ्याचवेळा प्रसारमाध्यमे महिला सबलीकरण व स्त्रीवाद या दोन्ही शब्द व संकल्पनांना समानर्थाने वापरतात. या दोन्ही संकल्पनांना भारतीय संदर्भाने सकारात्मक व नकारात्मक अर्थ आहेत. ज्याप्रमाणे भारतात अनेक उत्पादन, तंत्रज्ञान आणि विचारधारेस आयात केले जाते. अगदी त्याप्रमाणे स्त्रिवाद ही एक आयात केलेली विचारसरणी मानली जाते. (आधुनिक संदर्भाने) ज्याप्रमाणे विकसित देशात कोणत्याही उत्पादनावर प्रतिबंध लादल्यास त्याला तिसऱ्या जगात फेकले जाते. त्याप्रमाणे स्त्रिवाद ही एक आयात केलेली विचारसरणी आहे. ज्याचे भारतात कोणतेही नाही. भारतासारख्या समाजात स्त्रियांची ओळख दुसऱ्याद्वारे निर्धारित होते. तेथे स्त्रिवाद किंवा महिलांच्या चळवळीची चर्चा करणे हास्यापद होईल.

भारतात महिला वंशपरंपरेला चालवणाऱ्या एक सिम्बॉल आहेत. त्यामुळे त्यांना आपल्या कुटुंबाविरुध्द जाणे योग्य वाटत नाही. जरी समजा एखाद्या महिलेने तसा प्रयत्न केलाच तर ती आपल्या धर्म व संस्कृतीविरुध्द जाते. असा त्याचा अर्थ काढुन समाज व समाजधुरिण तिला वाळीत टाकतात. नवऱ्याने टाकून दिल्यानंतर स्वत:च्या हिमतीवर उभे टाकण्याचा सिंधुताई सपकाळांच्या प्राथमिक अवस्थेतील प्रयत्नाकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोण याच धाटणीतला होता. त्यामुळे भारतात स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतरही महिला चळवळी पुर्णपणे विकसित झाल्या नाहीत. त्या विकसित होण्यासाठीचा प्रदीर्घ ऐतिहासिक वारसा असूनही प्राचीन काळापासूनच



Scanned by CamScanner

भारतीय समाजात महिलांची स्थिती निम्नस्तराची राहिली आहे. महिलांची स्थिती खालावण्याचा नेमका कालखंड कोणता याच स्पष्टपणे उलगडा होत नाही. बऱ्याच प्राचीन धर्मग्रथांने स्त्रियांचा माणुसपणाचा हक्क नाकारला. युरोप व भारतीय प्रबोधनाच्या युगातही सर्व प्रकारच्या सामाजिक, धार्मिक,राजकीय व आर्थिक संस्था, मुल्य व व्यवस्थांनीही स्त्रियांच्या स्थितीविषयी प्रश्नचिन्ह निर्माण केले. महिलांच्या स्थितीविषयी निर्माण झालेल्या संशयाच्या मानसिकतेविषयी व्यापक प्रमाणात चिंतन व चर्चा त्याकाळात झाली. त्यामुळे जनतेकडून परिवर्तनाची अपेक्षा व इच्छा होवू लागली. स्वातंत्र्यपुर्वकाळात स्त्रियांच्या स्थितीविषयी कोणत्याही बदलास विरोध होता. संसदेत ३३% आरक्षणाविषयी चर्चा करताना काही राजकीय पक्षाची भुमिका त्याचप्रकारची जाणवते.

**संशोधनात्मक आराखडा :**

प्रस्तुत लेख भारतातील सामाजिक चळवळीच्या क्षेत्रातील अनेक विषयापैकी स्त्रियांच्या विविध चळवळीवर प्रकाश झोत टाकणार आहे. ज्यात महिलांच्या सबलीकरणासाठी या चळवळींनी कोणकोणते प्रश्न हाती घेवून त्याची सोडवणूक कशी केली याचे सविस्तर वर्णन व समीक्षण केले. या लेखात महिला सबलीकरणाशी संबंधीत आधुनिक युगातील चळवळीच्या यश-अपयशाचे अधिक स्पष्टीकरण केले. भारतात महिला सबलीकरणास युरोपप्रमाणे अधिक यश आले नाही. परंतु भारतातील पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतील स्त्रीचे स्थान लक्षात घेता जे यश आले ते समाधानकारक ओ. यास गृहित मानुन त्यांच्या अपयशाची कारणमिमांसा केली. या विषयास सत्यता व पूर्णत: यावी म्हणून ग्रंथालयीन व समीक्षणात्मक अभ्यासपध्दतीचा आधार घेवून तथ्य संकलन, वर्गीकरण व परिशीलन करण्यात आले. भारतातील महिला प्रबलीकरणाशी संबंधी चळवळी व पार्श्वभुमी, ध्येय धोरणे, भूमिका, कार्यक्रम समजुन घेण्याच्या हेतुने मांडणी करण्यात आली. आधुनिक भारतातील महिला सबलीकरणाशी निगडीत विविध चळवळींची सद्यस्थिती व त्यासमोरील अडथळयांना निगडीत विविध चळवळींची सद्यस्थिती व त्यासमोरील अडथळयांना जाणुन घेण्याइतपतची उपयुक्तता या लेखाची आहे. महिला प्रबलीकरण या विषयाकडे पाहण्याचा शासन, समाज, प्रशासन, राज्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व संघटना यांच्या दृष्टिकोनातील सकारात्मकता परंतु त्यास प्रत्यक्षात व्यवहार्य स्वरुप प्राप्त न होण्यामागच्या कारणांना समजुन घेण्याइतपतचे उपयोगिता मुल्य व उद्देशिकता या लेखाची आहे. सैराट चिटपट कोपर्डी बलात्कार या घटनेसंदर्भात महाराष्ट्रातील मराठा समाजाचा उद्रेक, महिलांच्यावाढते कौटूंबिक शोषण या सर्वामुळे या विषयाबाबतचे चिंतन व समीक्षण करावे हा विचार माझ्या मनाला स्पर्श करुन गेल्यामुळे या लिखाणसृष्टीची निर्मीती झाली.

प्रारंभी स्त्रियांशी संबंधित कोणत्याही प्रश्नाला सोडविण्यासाठी धार्मिक सस्थांची मान्यता घ्यावी लागत असत. ती एक अशी समाजव्यवस्था होती, ज्यात संपूर्ण समाज सरंचनेवर धर्माचा प्रभाव होता. अशा परिस्थितीत कोणत्याही प्रकारच्या बदलाचा अर्थ धर्म किंवा नैसर्गिक नियमांच्या विरुध्द जाण्यासमान होता. प्रबोधनाच्या युगाने परिवर्तनाचे वारे वाहु लागले. जो बदल समाज कल्याणासाठी होतो त्यासही समाजात सहजासहजी मान्यता मिळत नाही हे भारतीय समाजाचे लक्षण आहे. लोक त्याकडे संशयाच्या नजरेने पाहु लागतात. त्यामुळे समाजात बदलासाठी सामाजिक चळवळीचा मार्ग स्विकारावा लागतो. प्रत्येक सामाजिक चळवळीचे एक विशिष्ट उद्देश,विचारधारा, कार्यक्रम व संघटना असते. या सर्व तत्वांचा परस्परांना आधार असतो. तसेच ते एकमेकांना प्रभावित करत असतात. बऱ्याच चळवळीची विभागणी त्यांच्या विषयावरुन करता येते.बऱ्याच सामाजिक चळवळीची ओळख त्या चळवळीशी एकनिष्ठ असलेल्या कार्यकर्त्यावरुन ही होते.

उदा : एस.एम. जोशी समाजवादी, विनोबा भावे व जयप्रकाश नारायण- गांधीवादी व सर्वोदय इ. जुन्या आणि नव्या सामाजिक चळवळीत अधिक अंतर नाही. शेतकरी, राष्ट्रवादी, धार्मिक व महिला आंदोलन इ.स. आपण जरी आधुनिक चळवळी म्हणत असू तर त्या पुर्वीही अस्तित्वात होत्या. वर्तमानातील लोकप्रिय चळवळी स्वत:ची ओळख बनवण्यात किंवा सामाजिक हितसाध्य करण्यात गुंतल्या आहेत. महिला चळवळ हा सामाजिक चळवळीचाच एक भेग आहे.

इतर अनेक सामाजिक चळवळीच्या तुलनेत ही एक उपेक्षित व दुर्लक्षित चळवळ आहे. शेतकरी चळवळ, विद्यार्थी चळवळ, धार्मिक चळवळ, आदिवासी चळवळ व अल्पसंख्याच्या अधिकाराची चळवळ इ. सर्व लोकप्रिय व समाजाने दखल घेतलेल्या चळवळी म्हणुन ओळखल्या जातात.

भारतीय संस्कृती आणि महिला या चिंतनाशिवाय भारतातील महिला सबलीकरणावरील चर्चा पुर्ण होवू शकत नाही. कारण भारतीय संस्कृतीने महिलांना एका बाजुने फार श्रेष्ठ दर्जा दिला तर दुसऱ्या बाजूने तिचे मनुष्यत्वही हिरावून घेतले. कदाचित स्त्रि वर्गाविषयी असा परस्परविरोधाभास असणारी भारत ही एकमेव संस्कृती जगाच्या पाठीवर असावी. बऱ्याच धर्मग्रंथाने व कुटूंबाने स्त्रिस आणि लहान मुलींना आई-वडील किंवा वडिलधाऱ्या मंडळीकडून देवी माता म्हटले भारतात स्त्रिकडे आईच्या रुपाने पाहिले जाते. आई या शब्दाने स्त्रिस अनेक जबाबदारीच्या ओझ्याखाली दाबून टाकले. प्रेम, दया, त्यागाचे प्रतिक म्हणजे स्त्रि. त्यागामुळे स्त्रिस बऱ्याचवेळा अर्धपोटी निकृष्ट दर्जाचे अन्न खावून रहावे लागते. सामाजिक व कौटुंबिक परंपराच्या निर्वाहाकरिता स्वत:चे आयुष्य सर्मपित करणे नाही. हा शब्द स्त्रीच्या शब्दकोषात नसतोच. स्त्री स्वत:च मातेचे रुप आहे. बालपणापासून सामाजिक व कौटुंबिक संस्कार किंवा आचारसंहितेतून तीला स्त्री असल्याची जाणिव करुन दिली. जाते. मग तिने लहानपणापासूनच स्वयंपाक घरात आईला मदत करायची, लहान किंवा मोठया भाऊ व बहिणीची काळजी घ्यायची ज्याचे परस्पविरोधी चित्रण कुटूंब या मराठी चित्रपटात केले आहे. मुलगी तारुण्यावस्थेत पदार्पण करते न करते तोच तिच्या विवाहाचा



Scanned by CamScanner

विचार केला जातो. बरेच स्त्री विवाह बालपणातच आजही होतात. विवाहानंतर तिने निःस्वार्थपणे सासरची सेवा करावी. तरीही जाळपोळ, मारझोड, विहिरीत ढकलून देणे, टोचून बोलणे, उपासी ठेवणे हा त्रास तिला सहन करावा लागतो. ज्याचे चित्रण माहेरची साडी या चित्रपटात केले आहे. प्रामाणिक सेवा करुनही तिस अधिकार मिळत नाहीत. ते तिचे कर्तव्य समजले जाते. बालपणात विवाह होण्याने किंवा मुलगा आणि मुलगी यांच्यातर विशिष्ट अंतर असण्याच्या खुळचट कल्पनेचा विवाहासमयी विचार होतो. बऱ्यांचदा स्त्री युवा असतानाच तिचा पती मृत्यू पावतो. तेव्हा तीस सती जाण्यास भाग पाडले जाते. नव्हे ते स्वर्गात जाण्याचे उत्तम साधन मानले जाते.

जसे इस्लामी आतंकवादी दशहतवादी बनणे म्हणजे जन्नत मिळाल्याप्रमाणे मानतात. एकंदरीत भारतीय समाज धर्मग्रंथांनी स्त्रियांच्या कुटूंब व समाजाच्या हितार्थ कर्तव्य भावनेस धर्माशी जोडून तिच्या स्वातंत्र्याला बंदिस्त केले. तिचा जगण्याचा हक्क हिरावून घेतला. असा प्रयत्न भारतातील जवळपास सर्वच धर्मात आचरणाच्या पातळीवर होताना दिसतो, सिध्दांत जरी महिला सबलीकरणाचे समर्थन करणारे असले तरी

**भारतातील महिला चळवळ : ऐतिहासिक पार्श्वभुमी**

भारतातील महिला चळवळीचा अभ्यास प्रामुख्याने तीन भागात करता येतो. प्राचीन कालखंड,मध्ययुगीन कालखंड व आधुनिक कालखंड.प्रस्तुत लेखात महिला सबलीकरणाशी निगडीत आधुनिक युगातील चळवळी व विचारधाराचा विचार केला आहे. तरी त्यास पुर्णत्व याचे या उद्देशाने प्राचीन भारत व मध्ययुगीने भारतातील महिला सबलीकरणाची चळवळ व तीच्याशी निगडीत विचारधारावर ओझरता प्रकाश टाकला आहे.

इ.स. पुर्वकाळातील महात्मा गौतम बुध्दांच्या चिंतनात स्त्री शिक्षण, अभिव्यक्ति, स्वातंत्र्य,मानवी हक्क, समर्थन शोषणास विरोध, सन्मान, प्रतिष्ठा या विषयीचे चिंतन व पुरक कार्य स्पष्टपणे जाणवतो. महात्मा गौतम बुध्दांच्या विचारांची प्रेरणा घेवून सम्राट अशोकासह अनेक राजा व अनुयायांनी त्याच्या काळात महिलांच्या सामाजिक,आर्थिक व राजकीय स्थितीत सुधारणा केली. त्यांचा माणुस म्हणून सन्मान केला. मध्ययुगात १२ व्या शतकात दक्षिण भारतात वैदिक व सरंजामी व्यवस्थेत स्त्री सक्षमीकरणाची दिशा स्पष्ट करण्याचे कार्य महात्मा बसवेश्वरांनी केली. महात्मा बसवेश्वरांचा जन्मच मुळात स्त्री सक्षमीकरणार्थ होता. बसवेश्वरांनी स्त्रियांना सामाजिक, राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य विकसित करण्याची संधी दिली. अनुभवमंटपातून अभिव्यक्ति व संघटना स्वातंत्र्यास मान्यता दिली. त्यांना कन्नड भाषेतून वचने लिहिण्याची प्रेरणा दिली. अनुभव मंटपात ७७० सदस्यापैकी ७० महिलांना सभासदत्व दिले. वचनातुन स्त्री शक्तीचा सन्मान व कर्तृत्वाचा जागर आळवला. अक्कमहादेवी/अवकनागलांबिकेला स्वतःच्या वैचारिक व सामाजिक कार्याची प्रेरणा मानले.

महात्मा बसवेश्वरानंतर उत्तरेकडील संत कबीराच्या चिंतनात मात्र स्त्रियाविषयीची विटंबनाच जाणवते. वारकरी चळवळींनी अभंग रचनेतून स्त्री-पुरुष समतेचा जागर घातला. ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यंत अनेक संतानी स्त्रियांना अभंग रचण्याची व पांडुरंगाची निःस्त्रम भक्ती करण्याचे अधिकार दिले. बहिणाबाई, मुक्ताबाई, सोयराबाई, कान्होपात्रा जनाबाई,निर्मला बेणाबाई या महिला अभंगकरांनी आपल्या अभंगातून स्त्री- पुरुष समता, स्त्रि अस्मिता,जाणीवा अधिकाराची मांडणी केली. अवघा रंग रंगला श्रीरंग मी तू पण गेले वाया पहाता पंढरीच्या राया या अभंगातून सोयराबाईनी स्त्री-पुरुष समतेचे दर्शन मांडले. ज्याच्या घरी दोन नारी पाप वसे त्याच्या घरी असे तुकारामांनी सांगुन बहुविवाह पध्दतीच्या दुष्परिणामांना लोकांसमोर मांडुन लोकजागृती केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात स्त्रियांचा सन्मान वाढवला. तिच्या प्रतिष्ठा व अब्रुच्या संरक्षणाचे कवच म्हणून मावल्यास वैचारिक सक्षम बनवले. स्त्रिस अबला समजुन तिच्या चारित्र्याचे हणन करणाऱ्यांचे हात छाटले.

आधुनिक युगात ब्रिटीशांच्या वसाहतवादी शासनात काही वाईट व चांगल्या संस्कार व आचारसंहिताची रुजवणूक ब्रिटीश शासनापासून झाली. ब्रिटीशांनी भारतातील असभ्य आणि जुनाट विचाराने ग्रासलेल्या व्यवस्थेत परिवर्तन केले. भारतीयांना सभ्य व सुसंस्कृत बनवण्याचे प्रयत्न केले. इंग्रजानी भारतात शिक्षणाचा प्रचार व प्रसार केला. त्यांपासुन प्रेरित होवुन शिक्षण घेणारी भारतातील तरुणपिढी आधुनिक उदारमतवादी व लोकशाही विचारधारेच्या व संस्कृतीच्या संपर्कात आली. त्यांच्यातील संकुचित दृष्टिकोनास समाप्त केले. याशिवाय अनेक ख्रिश्चन मशनरींनी भारतात धार्मिक सुधारणेचे कार्य केले. ज्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेत काहीसा बदल झाला. ज्यात प्रामुख्याने सतीप्रथा, बालविवाह,विधवा विवाहास बंदी, बहुविवाह, हुंडापध्दती इ. सामाजिक प्रथापासून दुर करण्याचा उद्देश होता. महिलांना सती प्रथेपासून वाचवण्यासाठी अधुनिक युगात अनेक पुरुषांनी उल्लेखीय कार्य केले. १९ व्या व २० व्या शतकात भारतात ब्राह्मो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, सर्वोदयी विचारधारा आंबेडकरी विचारसरणीने महिला सबलीकरणाच्या चळवळीस गतिमान केले. ज्याची परिणीती संविधानातून स्त्रियांना पुरुषासमान मिळणाऱ्या समान मत, मुल्य, अधिकारातून झाली.

**ब्राह्मो समाज अणि महिला सबलीकरण :**

१८२८ मध्ये राजाराममोहन रॉयानी ब्राह्मो समाजाची स्थापना केली. बालपणातच आपल्या वहिणीला भावाच्या मृत्युनंतर सती जाताना रॉयनी पाहिले होते. ज्याचा तीव्र परिणाम त्यांच्यावर झाला. पुढील काळात रॉयनी पाश्चिमात्य तत्वज्ञानाचा अभ्यास केला. ते त्याचे समर्थक व प्रचारक बनले. तेथील उदारमतवादी विचारधारेने ते अधिक प्रभावीत झाले. भारताकडे एक विशाल व समृध्द सांस्कृतिक वारशा आहे. परंतु त्यात अनेक सामाजिक वरिष्ठांचा शिरकावही झाला. जे स्वभावत : अमानवीय व असभ्य आहे. रॉय स्थापित सामाजिक संघटनेने सती प्रथेचे निर्मुलन, स्त्री शिक्षण, वडीलोपार्जित व पतीच्या संपत्तीत महिलांचा वाटा, विधवा पुर्नविवाह आणि



ADAT VYAPARI ... DEGLOOR COLLEGE ... SOCIETY'S DEGLOOR Dist.Nanded

Scanned by CamScanner

आतंरजातीय विवाहाचे समर्थन केले. तत्काळातील उत्तर भारत व बंगालमधील प्रचलित बहुविवाह पध्दतीस तीव्र विरोध केला. सुशिक्षित महिलाच आपल्या सामाजिक व आर्थिक स्थितीत बदल घडवू शकतात हा विश्वास रॉय यांना होता. ब्राहमो समाजाने महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी बोधिनी पत्रिका या नावाने फक्त महिलांसाठी एक पत्रीका काढली होती.

१८७२ ला बनलेला नागरिक विवाह कायदा पारित करण्यात ब्राह्मो समाजाचे अधिक योगदान आहे. या कायदयामुळे आंतरजातीय विवाह व घटस्फोटास कायदेशीर अधिकार व पाठिंबा मिळाला. स्त्री व पुरुषांच्या विवाहाची अनुक्रमे १४ व १८ अशी वयोमर्यादाही निश्चित करण्यात आली.

**आर्य समाज :**

स्वामी दयानंद सरस्वतीनी १८७५ मध्ये आर्य समाजाची स्थापना केली. त्यांनी धार्मिक भोंदुगिरीस समाप्त करण्याचे सर्व प्रयत्न केले. हिंदुत्वावर आधारित वैदिक संस्कृतिला स्थापन करण्याचा विचार होता. ज्यात महिलांना अधिक सन्मान होता. बालविवाह,जातिप्रथा, सतीप्रथा, विधवा विवाहास विरोध केला. स्त्रियांच्या सामाजिक समतेच्या विचारधारेस मजबुत करण्याचे कार्य यांनी केले.

**प्रार्थना समाज :**

१८६७ साली एम.जी. रानडे व भांडारकर यांनी प्रार्थना समाजाची स्थापना केली. ज्याचा उद्देश ब्राह्मो समाजासारखाच होता. प्रार्थना समाजाने महिलांच्या शिक्षणावर अधिक भर दिला. स्त्रिस एक उत्तम पत्नी व आई बनण्यासाठी शिक्षणाची नितांत गरज आहे.

**सत्यशोधकी स्त्री चळवळी :**

१९ व्या शतकात महात्मा फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. महात्मा फुले आणि स्त्रियांचे सक्षमीकरण यांचे अट नाते आहे. ज्याचे प्रतिबिंब त्यांच्या सत्यशोधक समाजाच्या विचारधारेत स्पष्टपणे जाणवते. स्त्री शिक्षण, स्त्री-पुरुष समता मान्य केली. स्त्रियांची गुलामगिरी हा हिंदु संस्कृतीचा आणि स्तरीकृत समाज व्यवस्थेचा एक भाग होता. स्त्रियांना काही सामाजिक व कौटुंबिक त्रासातून आणि अडचणीतून तात्काळ सोडवणे आवश्यक असल्याचे फुल्यांना वाटे त्यामुळे त्यांनी स्त्री शिक्षण, विधवा विवाह, बहुपतीवर बंदी यांना विरोध करण्याचे स्वत: प्रयोग केले. १८५१ ला पहिली मुलींची शाळा काढली. विधवा व अनिधीकृत्त गरोदर विधवांना आपल्या घरी आश्रय दिला. बालविवाहास विरोध केला. सत्यशोधक समाजाच्या विवाहात आपल्या पत्नीचा शिक्षणाच हक्क मान्य करणे अनिवार्य होते. त्यास तशी शपथघ्यावी लागे. स्त्री पुरुषापेक्षा सरश आहे. स्त्रिच्या तुलनेत पुरुषच जास्त पक्षपाती दुष्ट आणि दुराग्रही असतात.

महिलांच्या शिक्षणाचा आवाज फक्त परकीय मिशनरी आणि त्यांच्या आंदोलनातच दिसुन येत नाही. तर पाश्चिमात्य शिक्षण प्राप्त केलेल्या आधुनिक युगातील पुरुषांच्या विचारातही ते जाणवते ज्यांनी स्त्रियांच्या कौटुंबिक स्थितीत सुधारणा करण्याचे प्रयत्न केले. ज्यात प्रामुख्याने ईश्वरचंद्र विद्यासागर आणि महात्मा ज्योतिबा फुल्यांचा विचार करावा लागेल. स्त्रियांना समाजातील सर्वप्रकारच्या सुविधांचा उपभोग स्त्रियांनी घ्यावा म्हणुन त्याना सुशिक्षित बनवणे गरजेचे मानले. या ठिकाणी एक विचार करण्यासारखी बाबत आहे की, महिला सबलीकरणाच्या चळवळीत महिलांचा पुढाकार नगण्य स्वरुपाचा आहे. महिला शुद्र,अस्पृश्य व गुलाम होत्या तेव्हा त्यांनी सर्व काही सहन केले. जेव्हा पुरुषांनी त्याच्या कल्याणाचा प्रयत्न केला तेव्हा ही त्यांनी शांतपणे सर्व सहन केले. पुरुष त्यांना शिक्षणापासून दुर ठेवत होते.लोकशाही व्यवस्थेत स्त्री शिक्षणाला नौकरीच्या अर्थकारणाचे व राजकारणाचे जोडलेले संदर्भ लक्षात घेवून पुरुषांनी स्त्रियांच्या शिक्षणास मान्यता दिली. जे स्त्रियांच्या मुक्ततेविषयीच्या पुरुषी मानसिकतेतला पहिला बदल आहे. यात काही प्रमाणात उणिवा जाणवतात. त्या म्हणजे एक उत्तम गृहिणी व आई निर्माण होण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता असते. स्त्री शिक्षणाच्या चळवळीने महिलांच्या कौटूंबिक स्थितीत बदल केला. परंतु सामाजिक व्यवस्थेतील महिलांच्या सुधारणेविषयी काही प्रयत्न झाले नाहीत. जे झाले त्यात फारसे यश झाले नाही. तरीही या चळवळीस बाल्यावस्थेतील चळवळ म्हणून पहाता येते.

सामाजिक व राजकीय क्षेत्रातील महिलांच्या सहभागास व स्थितीतील सुधारणेत प्रामुख्याने गांधीयुगापासून बदल झाला. ज्यास आंबेडकरी विचारधारेने व संविधान सभेने संविधानात कायदेशीर मान्यता दिली. महात्मा गांधीनी स्त्रियांना स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होण्याचे आव्हान केले. ते स्त्री आणि पुरुष समानेतवर विश्वास ठेवत होते. मी महिला अधिकाराबाबत कोणतीही तडजोड करण्यास तयार नाही असे गांधी म्हणत. चुलं आणि मुलं या कार्यक्षेत्रातून स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होण्यासाठी महिलांना एक संधी दिली. गांधीच्या मते सत्याग्रह चळवळ स्त्रियुक्त गुणांनीच भारलेली आहे. त्यामुळे त्या त्यास सहजपणे आणि प्रभाविपणे स्विकारु व त्याची अंमलबजावणी करु शकतात. पंडित नेहरु पश्चिमेकडील सुधारणावादी व उदारमतवादी लोकशाही विचारधारेने प्रभावित होते.त्यामुळे त्यांनी स्त्रियांच्या मताधिकाराचे समर्थन केले. त्यांच्या मते फक्त शिक्षणानेच महिलांच्या स्थितीत सुधारणा होवू शकत नाही, त्यासाठी त्यांना आर्थिक,राजकीय व सामाजिक स्वातंत्र्याची आवश्यकता आहे. १९१७ मध्ये व्हाईसरायसमोर स्त्रियांच्या मताधिकाराची मागणी ठेवण्यात आली. त्या प्रतिनिधीमंडळात सरोजिनी नायडू आणि मारग्रेट कॉसिन या महिलांचा सहभाग होता. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसनेही महिलांच्या मताधिकारास पुर्ण समर्थन दिले. त्यामुळेच महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला. सर्वात प्रथम मद्रास प्रांताने महिलांच्या मतदान अधिकाराबाबत महत्वपुर्ण पाऊल उचलले त्यामुळे १९२७ साली मुथुलक्ष्मी रेड्डी मद्रास विधान परिषदेच्या सदस्य म्हणुन नियुक्त झाल्या.

स्वातंत्र्य चळवळीने महिलांना पारंपारिक बंधनास झुगारुन आणि पुरुषांसोबत आपल्या क्षमतेला सिध्द करण्याची संधी दिली. महात्मा गांधी महिलांच्या अधिकाराचे समर्थक होते. शोषण आणि



Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded



त्रास सहन करण्याचे प्रतीक असणाऱ्या सीता अणि दमयंतीस गांधीनी आदर्श स्त्री म्हणून जगासमोर मांडले. वास्तवतेत स्वातंत्र्य चळवळीला पुरुषामार्फत नियंत्रित व संचलित केले होते. तसेच यात पुरुषांनी स्त्रियासोबत समुदाय स्थापन केले.

**सामाजिक चळवळीतील महिलांचा सहभाग :**

भारतातील महिला चळवळ काळाप्रमाणे अनेक बदलास सहन करत पुढे मार्गक्रमन करत आहे, स्पष्टपणे या चळवळीस संघटीत चळवळ म्हणता येणार नाही. परंतु अलिकडील बलात्कार, लोकपाल चळवळ इ.प्रश्नी महिलांच्या चळवळीतील संघटीतपणा वाढत असल्याचे जाणवतो. तसेच डिजिटिल चळवळीतील निवडणूक अभियान व विविध प्रश्नांबाबतचा महिलांचा सोशल मिडीया (फेसबुक, व्हॉटसअप, इंटरनेट ट्विट्र) या वरील सहभागात विलक्षण वाढ संघटितपणा वाढत आहे. अलिकडे अनेक विविध मुदयाबाबत महिलांचा सहभाग वाढत आहे. मग तो स्त्रिभ्रुण हत्या, मानवी हक्क, कोटुंबिक हिंसाचार,पर्यावरण,शारिरीक शोषण या सारखे विषयात ही स्त्रियांचा आवाज सामुहिकपणे प्रसारमाध्यमातून (प्रिंट व इलेक्ट्रानिक) शासन व समाजासमोर येत आहे. २१ वे शतक हे महिलांचे शतक आहे. त्यामुळे यात अधिक वाढ होण्याची शक्यता आहे. परंतु तुर्तास तरी संपूर्ण व्यवस्था व त्या व्यवस्थेचा सुत्रधार पुरुष व पुरुषप्रधान मानसिकता बाळगणारा वर्गाचा आहेत. त्यामुळे त्याकडे लक्ष दिले जात नाही. फार फार तर त्याविषयी कॅंडल मार्च (महिलाचाच अधिक सहभाग) निवेदन इ. गांधीवादी मार्गाचा वापर केला जातो.

**१) तिभागा चळवळ :** आंध्रप्रदेशातील तिभागा संघर्ष हा तेथील निजामाविरुध्द शेतात काम करणाऱ्या मजुरांनी आपल्या अधिकारांसाठी केलेले आंदोलन आहे. ज्यात गनिमी युध्द तंत्राचा वापर करण्यात आला. ज्यास भारतीय साम्यवादी पक्षाचे समर्थन प्राप्त होते. जे राज्यसंस्थेच्या शोषणाविरुध्द होते. यात प्रामुख्याने जातीवर आधारीत अन्याय व शोषणाचा प्रश्न समाविष्ट होता. या चळवळीत स्त्रियांनी सक्रिय सहभाग नोंदवला ग्रामीण स्तरावर आत्मसरंक्षण समिती बनवली ज्यांनी महिलांसोबत होणाऱ्या मारहाणीस विरोध करुन पितृसत्ताक व्यवस्थेला आव्हान दिले.

**२) तेलंगाना चळवळ :** तेलंगाना चहवळीस महिलांचे व्यापक प्रमाणात समर्थन प्राप्त होते. यातही गनिमी युध्दाचा समावेश करण्यात आला. परंतु आजपर्यंत या चळवळीची योग्य प्रमाणात चर्चा झाली नाही. स्वातंत्र्यानंतर स्त्रियांचे शोषण होणार नाही, अशी अपेक्षा बाळगणाऱ्या स्त्रियांचा भ्रमनिरास झाला. त्यामुळे स्त्रियांनी स्वतःस आलेल्या अनुभवाची चर्चा लोकमानसात केली. ज्यामुळे त्या तेलंगाना चळवळीपासून दूर झाल्या.

**३) भाववाढी विरुध्द चळवळ:** दैनंदिन जिवनात लागणाऱ्या वस्तुंच्या किंमतीत सातत्याने वाढ होत आहे. ज्याचा सरळसरळ महिलांना सामना करावा लागतो. स्त्रियांना पुरुषांनी दिलेल्या पैशात घर खर्च भागवावा लागतो. ते वाढत्या महागाईने शक्य होत नाही. आमदानी अठ्ठनी खर्चा रुपया अशी अवस्था होते. १९७० पासून भारतात भाववाढीच्या विरुध्दच्या आंदोलनात महिलांचा सहभाग वाढत आहे. बऱ्याच भागात या आंदोलनाचे नेतृत्व महिलांनी केले. अलिकडील काळात भाववाढ हा दैनंदिन व राजकीय जिवनाचा भाग बनला. विशेषतः डिझेल,पेट्रोलच्या भाववाढीमुळे दैनंदिन जिवनात लागणाऱ्या वस्तुंचे भाव वाढतात. महाराष्ट्रात ग्रामीण भागात वस्तुंच्या वाढत्या किंमतींच्या विरोध करण्यासाठी युनायटेड विमेन्स ऐन्ट्री प्राईस राईज फ्रंट ची स्थापना करण्यात आली होती.

अनेक गृहिणी महिला त्यात सहभागी झाल्या. त्यांनी शासकीय कर्मचारी, संसद सदस्य व व्यापाऱ्यांकडे जावून त्यांना बांगडया घालण्यास दिल्या. १९७४ च्या नवनिर्माण आंदोलन नावाने हे आंदोलन गुजरामध्ये दिसून आले. अलिकडे मुंबई, दिल्ली, कलकत्ता, मद्रास, बंगलोर, हैद्राबाद,चेन्नई यासारख्या शहरातून भाववाढी विरुध्द शासनाचा निषेध करण्यासाठी अनेकवेळा मोर्च्यांचे आयोजन केले जाते. परंतु अलिकडे या मोर्च्यांना पक्षीय स्वरुप प्राप्त झाले. तरीही यानिमित्तने महिलामध्ये वर्तमान राज्य व अर्थशास्त्राविषयीची जाण अधिक सजग व विकसित होताना दिसते.

**विविध विषयावरील महिला चळवळ :**

१९७० व १९८० च्या दशकात भारतात अशा अनेक चळवळीचा जन्म झाला ज्यास विविध विषयांचा स्पर्श होता. या विषयांच्या अधिक जवळीकतेमुळे या चळवळीना तीव्र व्यापक रुप प्राप्त झाले. या चळवळीनी थोडयाच कालावधीत आपली एक ओळख बनवली. य आंदोलनास विषयावर आधारीत आंदोलन म्हणता येणार नाही. मग ते पर्यावरणाशी संबधीत चिपको आंदोलन असो जे स्त्रित्वाच्या ओळखीला सोबत घेवून पुढे सरसावले शहाबानो प्रकरण, दिल्लीतील बसमधील महिलेवरील बलात्काराचे आंदोलन आम आदमी पक्षाची चळवळ,लोकपाल चळवळ बाबा आमटेंची भारत जोडो अभियान, बचत गट चळवळ, भ्रष्टाचार मुक्ती चळवळ, तृप्ती देसाइचे आंदोलन शनी मंदिराचे, डॉ. नरेंद्र दाभोळकरांची अंधश्रध्दा निर्मुलनाची चळवळ डॉ. राणाजगजीत सिंहाची पाण्याची चळवळ या सर्व चळवळीनी महाराष्ट्रातील मराठा समाजाचा मुक मोर्चा स्त्रियांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत विषयांना स्पर्श केला. ज्यातून स्त्री संघटना, स्त्री सुरक्षा, स्त्री शोषण स्त्री अधिकार या सर्वांना समाविष्ट करणारी महिला सबलीकरणाची संकल्पना व विचारधारा स्त्रियांत विकसित होत आहे.

**१) चिपको आंदोलन :**

चिपको आंदोलनाची ओळख अधिक तर पर्यावरणीय आंदोलन या अर्थानेच होते. ज्याची सुरुवात १९७२-१९७३ मध्ये झाली. या आंदोलनाची आणखी एक दुसरी ओळख म्हणजे हे आंदोलन महिला आंदोलन म्हणून ही ओळखले जाते. कारण त्या आंदोलनात सहभागी होणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांत अधिक महिलाच होत्या. तसेच हे आंदोलन स्त्रिप्रधान गुणावर आधारीत होते. या आंदोलनाने पर्वतीयक्षेत्रात राहणाऱ्या महिलांच्या प्रतिबंध्दता व नैतिक शक्तिला प्रर्दशित केले. झाडांच्या रक्षणासाठी महिला स्थानिक ठेकेदारासह



Scanned by CamScanner

VYAPARI EDUCATION SOCIETY'S ... COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded



पुलिसासोबतपण संघर्ष केला.

या आंदोलनाला दारुबंदी आंदोलनाची छटा होती हजारो महिलांनी दारुच्या दुकानाला घेरले. १९९५ ला या भागात भयंकर वृष्टी झाली. तेव्हा येथील महिलांनी हिमा देवीच्या नेतृत्वात लोकांना हा विश्वास दिला की, वृक्षाच्या तोडीने पर्वताचे नुकसान होते. त्यांनी जंगलाच्या व्यावसायिक शोषणावर पुर्णपणे प्रतिबंध करावा अशी मागणी केली. त्यांनी जंगलाच्या अवैध मार्गाने होणाऱ्या वृक्षतोडीस खंबीर विरोध केला. या चिपको आंदोलनाने महिलांना घराच्या चार भितीत बंदीस्त न राहता घराबाहेर येवून लोकांना विरोध करणे व अभिव्यक्त करण्याची संधी दिली. त्यामुळे या आंदोलनास महिलांच्या गरजा पुर्ण करणारे आंदोलन म्हणून संबोधले गेले.

**सती प्रथेच्या विरुध्दची चर्चा :**

सतीप्रथा हा भारतीय समाजव्यवस्थेवरचा एक कलंक आहे. ज्यात गौतम बुध्दापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरा पर्यतच्या अनेक समाजसुधारकांनी सुधारणावादी चळवळीतून नष्ट केले. परंतु २० व्या शतकाच्या शेवटच्या टप्प्यात या विषयावर बरीच चर्चा झाली. त्याचे कारण म्हणजे राजस्थानातील रुपकंवरच्या सती जाण्याची घटना प्रकाशात आली. या घटनेकडे एक हत्या म्हणून पाहण्यात आले. यास एक सार्वजनिक समारोह बनवण्याचा हेतूने व्यापक स्तरावर प्रचारित करण्यात आले. रुपकंवरच्या मृत्यूचा खूप प्रचार झाला. त्यावर विचार विनिमय व प्रतिक्रिया देणाऱ्याचे दोन गटात विभाजन झाले. एक गट तिच्या मुत्यूस आपली संस्कृती व परंपराचे रक्षक समजून समर्थन करु लागला. तर दुसरा गट त्यांचा विरोध करत होता. पहिल्या गटासाठी ते क्षत्रिय हिंदू ओळखीचा अभिमान होते. बनारस व पुरीच्या पुजाऱ्यांनी त्याचे समर्थन केले. त्यांच्यामते ही घटना केवळ राजपूत संस्कृतीच नाही तर संपूर्ण हिंदु संस्कृतीचा एक हिस्सा आहे. सतीप्रथे सारख्या विषयाला हिंदु पर्सनल लॉ मध्ये समाविष्ट करावे, असा सल्लाही दिला. महाराष्ट्रात शिवसेनेने सतीप्रथेच्या समर्थनात काही मोर्चे काढले. त्यांच्यामते ही प्रथा हिंदु महिलांच्या खऱ्या इच्छेला दर्शवते. त्यामुळे अशा घटना व कृत्यावर प्रतिबंध लावणे म्हणजे त्यांच्या संप्रदायातील लोकभावनेस तंडा पोहचवणे त्यांच्यामते आत्महत्या करण्याचा अधिकार काही क्षेत्रात मान्य आहे. यावर स्त्रिवादयांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. स्त्रिवादयांच्या मते, आत्महत्या करण्याच्या अधिकारास सार्वजनिक उत्सवाचे स्वरुप येवू नये. आत्महत्येस एखादी स्त्री आपले जिवन स्वत: समाप्त करतात. तर सतीप्रथेच्या चितेस आग लावणारे हाथ दुसऱ्याचे असतात या प्रकरणाने संपूर्ण देशाला सती प्रथेसारख्या विषयावर विचार करण्यास भाग पाडले.

**शारिरीक शोषणाविरुध्द संघर्षाचे आंदोलन :**

महिलांना आजपर्यंत या देशातील पितृसत्ताक व्यवस्थेने अबोलते बनवले. महिलांचे चित्र प्रतिव्रता व सतीत्वासी बंदिस्त रेखाटले. त्यामुळे महिलेला शारिरीक शोषणासारखे विषय व प्रकार चुपचाप सहन करावे लागले. महिलांची सुरक्षितता पुरुष व पुरुषप्रधान मानसिकतेवर अवलंबुन आहे. कोणत्याही स्त्रिच्या चारित्र्याचे हणन अधिक प्रमाणात पुरुषाकडूनच होते. बलात्काराच्या प्रकारात स्त्रियानाच दु:ख झेलावे लागते. कारण समाजाकडुन तिला बहिष्कृत केले जाते. तर अपराध्यास स्वतंत्र सोडले जाते. पुरुषाकडुन बलात्कारास एक संस्थात्मक रुप देण्यात आले. कारण स्त्रियांचे शोषण व्हावे. १९७०-१९८० च्या दशकापासून ते आजपर्यंत वारंवार बलात्काराबाबत अनेक ठिकाणी विरोध व असंतोषाचे स्वर कानी पडतात. उदा. कोपर्डी घटना व तिचे पडसाद. बलात्काराविषयीचे कायदयात परिवर्तन व त्याविषयी पुर्नविचार करण्याची मागणी पुढे आली. ज्याचा परिणाम संसदेत बलात्कारी व्यक्तिस मुत्यूदंड देण्याची तरतूद करावी अशी मागणी पुढे आली ज्यातून संसदेने एक कायदा पास केला. जो आपणास निर्दोष सिध्द करण्यासाठी प्रमाण उपलब्ध करण्याचा भार अभियुक्ताच्या खांदयावर टाकतो, न कि पिडित महिलेवर, या विधेयकायाने स्त्रिवादयांना एक नविन संजिवनी दिली. परंतु त्याचा हा आनंद १९८८ च्या सुमन बलात्कार खटल्यात सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निकालावरुन थंडावला बलात्कारी अभियुक्ताला पिडित महिलेचा मित्र असल्याचे सांगितले. यावरुन हे सिध्द होते की, कशाप्रकारे आचरण आणि व्यवहाराशी संबंधित प्राचीन परंपरा, कौमार्य आणि पावित्र्यासारखे दृष्टिकान भारतात न्यायदान प्रकियेच्या आड येतात.

सामाजिक कार्यकर्ता कविता श्रीवास्तवच्या मते बलात्कार नेहमी बलात्कार करण्याच्या इरादयाने होत नसतो. परंतु त्यात नेहमी आपली ताकद दाखवणे आणि बदला घेण्याची भावना अंतर्भुत असते. उदा : दलित समाजातील भवंरी देवीवर गावातील सुवर्ण जातीतील लोकांनी जो सामुहिक बलात्कार केला ज्याचे मुख्य कारण तिने बाल-विवाह या सामाजिक वाईट रुढीविरुध्द उठवलेला आवाज या महिलेने आपली मर्यादा ओलांडल्यामुळे तिला धडा शिकवण्यासाठी हे केले. महिलांकडे समुहाची इज्जत या भावनेतून पाहिले जाते. तिच्या सोबत झालेला बलात्कार एका समुहाकडून दुसऱ्या समुहास धडा शिकवण्यासाठी केलेली कृती समजली जाते. वास्तवेत महिलांना इज्जतिचे प्रतिक समजल्यामूळे त्याच्या विरुध्द शारिरीक शोषणाच्या घटनात वाढ होते. कौटूंबिक व नाते संबधात होणाऱ्या बलात्काराच्या घटना बऱ्याच वेळा नोंदवल्या जात नाहीत. कारण हा बलात्कार एखादया नातेसंबधातुन होतो या घटनेला पोलिस ठाण्यात नोंदवणे म्हणजे कुटुंबाच्या प्रतिष्ठेवर धब्बा लावणे होईल. त्यामुळे ते शांत बसतात. तसेच न्यायदान व कायदयाची किचकट प्रक्रिया आणि गुन्हेगाराला गुन्हेगार सिध्द करण्यात येणाऱ्या अडचणी अन्याय प्रस्तास शांत राहण्यास प्रेरित करतात. अशाच प्रकारचे अपराध आपणास पतीमार्फत होणाऱ्या बलात्कारात पहाव्यास मिळतात. विवाह पुरुषास स्त्रीसोबत शारिरीक संबंध ठेवण्याची परवागनी देतो. त्यामुळे वैवाहिक जिवनात प्रतिव्दारा होणाऱ्या बलात्कारास अपराध म्हणुन पाहिले जात नाही. यात जर पत्नी आपल्या पतीविरुध्द जात असेल तर नेहमी पत्नीवरच आरोप लावला जातो की, तिने पत्नीधर्माचे पालन



Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded



केले नाही.

अलिकडील काळातील भांडवलशाही व भांडवली व्यवस्थेत कंपनी, ऑफिस या ठिकाणी महिलांच्या काम करण्याच्या प्रमाणात वाढ झाली. अगदी घरापासून ते संसदेपर्यंत महिला व तिचे शरीर सौंदर्य लोकांची वासनामय भुख भागवण्याचे साधन बनले. यातुन महिलांची सुटका करण्यासाठी अनेक प्रयत्न शासकीय पातळीवर होत आहेत. परंतु ती एक मानसिक विकृती आहे. यास प्रबोधन व लैंगिक शिक्षणाच्या प्रचार व प्रसाराने दुर करता येते.

**हुंडा पध्दती :**

हुंडा प्रतिबंध अधिनियम १९६१ ला १९८४ मध्ये संशोधित करण्यात आले. ज्यात हुंडयाच्या रक्कमेची मर्यादा निर्धारित करण्यात आली. परंतु हुंडा देण्याच्या पध्दतीवर प्रतिबंध लावला नाही. अलिकडे हुंडा पध्दती वेगवेगळया स्वरुपाने वाढत आहे. हुंडा घेणे हा दंडनीय अपराध आहे. याची सर्वांना माहिती आहे. तरी ही हुंडा पध्दतीला संपवण्याच्या दिशेने प्रयत्न झाले नाहीत. हुंडयाकडे साधारणतः स्त्रिधनाच्या स्वरुपात पाहिजे जाते. जे साधारणपणे विवाह समयी आई-वडिलाकडून मुलीस दिले जाते. परंतु त्यातील अतिशय अल्प भाग मुलीला मिळतो. अधिकतर भेटवस्तु व जेवणावरच खर्च होतो. प्रथेनुसार स्त्रिधनास स्त्रिच्या संपत्तीच्या रुपात बघावे. त्यावर तिचा पूर्ण अधिकार असावा. हुंडयाची समस्या त्यात परिवर्तन करण्याऐवजी त्यास नष्ट केल्यानेच संपते. वास्तवतेत हुंडयास एका सामाजिक संकटात रुपांतरीत करण्यात आमची संस्कृती बऱ्याच प्रमाणात जबाबदार आहे. ज्यापासुन सुटका मिळवणे अतिशय कठिण आहे. सर्वात प्रथम स्त्रिस आपल्या वडीलाच्या संपत्तीतुन बेदखल केले जाते. मुलीकडे परकीय धन म्हणुन बघतात. यामुळे तिस वडिलांच्या संपत्तीत कोणताही हिस्सा / वाटा मिळत नाही. याबदल्यात तिला मुलाला देण्यात येणाऱ्या संपत्तीतील वाटयापेखा अधिक वाटा हुंडयाच्या रुपात देवून सासरी पाठवले जाते. हुंडा पध्दत ही एक गुंतवणुक आहे. ज्यामार्फत आई- वडील आपल्या मुलीस तिच्या सासरच्या संपत्तीत भागीदार बनण्यास पात्र बनवतात. यामुळे भारतीय मुलींना हे माहित असते की, माहेरच्या संपत्तीत तिचा कांहीच वाटा नसतो. त्यामुळे त्यास आपल्याला देण्यात येणाऱ्या हुंडयास अधिक प्रमाणात घेण्यास नकार देत नाहीत. सासरीपण तिची प्रतिष्ठा यावरच ठरते. ती किती प्रमाणात हुंडा घेवून येते. १९७५ च्या महिला चळवळीत महिलांच्या प्रगतशील संघटनाकडून संघटित विरोध व प्रदर्शन झाले. ज्यात अलिकडील काळात वाढ होत आहे. २१ वे शतक हे महिलांचेच शतक म्हणुन संबोधले जाते. ज्याची प्रचिती महिलांच्या वाढत्या सामाजिक संघटनातुन व शिक्षण मिळवण्याच्या प्रवृत्तीतुन येते. इंदिरा गांधीनी घोषित केलेल्या आणिबाणीनंतर महिला आंदोलनास नवीन आयाम प्राप्त झाले. या उलट आणिबाणीच्या घोषणेने समाजात घटनात्मक हक्का प्रतिची जागृती वाढली. हुंडा पध्दतीमुळे होणारे खुन व आत्महत्याकडे लोकांचे लक्ष गेले. हुंडयामुळे सासरच्या लोकांकडून होणाऱ्या त्रासास कंटाळून मुली आत्महत्या करु लागल्या. हुंडयामुळे मला जीवे मारले असा जबाब त्या पोलिस व न्यायालयात देवु लागल्या. यामुळे स्त्री चळवळ व संघटनास बळ मिळाले. संपूर्ण भारतात जागोजागी अशा घटनांच्या विरुध्द मोर्चा व प्रदर्शने होवू लागली. हुंडयामुळे होणाऱ्या हत्येस आत्महत्येचे रुप देवुन स्वतःस लपवण्याचे प्रयत्न होवू लागेत म्हणुन अशा प्रत्येक हत्येची पोलिस तपासणी होईल असा कायदा १९८० ला बनवला. १९८२ ला दिल्लीच्या सत्र न्यायालयाने दोन लोकांना हुंडा हत्येत दोषी माणुन फाशीची शिक्षा सुनावली. या शिक्षेला उच्च व सर्वोच्च न्यायालयाने कमी करुन जन्मठेपेत रुपांतरीत केले. हुंडा पध्दतीस या देशातील पितृसत्ताक व्यवस्थेचा आधार आहे. मुलींना देण्यात येणारा हुंडा त्यांच्या संपत्तीत वाढ करतो त्यामुळे तिला माहेरच्या संपत्ती वाटा मिळत नाही.

एखादया मुलीने विवाहात आणलेल्या हुंडयावर तिच्या सासरच्या अधिकार समजला जातो. तेंव्हा वास्तवतेत स्त्रिला कांहीच मिळत नाही. कायदयाने स्त्रीला विवाहानंतर माहेरच्या संपत्तीवर हक्क सांगता येतो. परंतु व्यवहाराच्या पातळीवर ते कठीण जाते. जर समजा कोणत्या कारणामुळे ती विधवा झाली व पैसा कमवत नसेल तर दुसऱ्याच्या दयेवर जगावे लागते. दुसऱ्याने जर तिच्याकडे दुर्लक्ष केले तर जिवण संपवण्याशिवाय किंवा गरीबीत खितपत जगण्याशिवाय तिच्याकडे दुसरा पर्याय नाही. अशा वेळेस तिला माहेर व सासर दोन्हीकडे जागा मिळत नाही. ज्यास सिंधुताई सपकाळ या चित्रपटात उत्तमरित्या दिग्दर्शकाने दाखवले. कायदा कितीही मोठे आश्वासन देत असला तरी, एक विवाहित स्त्री दोन्ही कुटुंबात एक उपेक्षित व शोषीत सदस्य म्हणुनच रहाते.

**राजकीय सहभागासाठीचे आंदोलन :**

जोपर्यंत महिलांचे योग्य प्रतिनिधीत्व असणार नाही तोपर्यंत त्यांच्या स्थितीत सुधारणा शक्य नाही, अशी अनेक वर्षापासुनची चर्चा ऐकण्यास मिळते. भारतीय महिला इतर प्रगत देशापेक्षा अतिशय भाग्यवान आहेत की, त्यांना स्वातंत्र्यापासुनच मतदानाचा अधिकार मिळाला. परंतु फक्त त्यांना मतदानाचा अधिकार दिल्याने आपल्या अधिकार व स्वातंत्र्याचा वापर करण्याची संधी मिळत नाही. कारण आमच्याकडे बऱ्याच वर्षापासुन सामाजिक रुढी परंपरामुळे कमी - अधिक प्रमाणात सर्वच महिलांचे शोषण झाले. त्यामुळे कायदेमंडळात अधिकाधिक महिलांना निवडुन दयावे. मागील बऱ्याच वर्षापासुन संसदेत महिला आरक्षण विधेयकाला टाळण्याचे प्रयत्न होत आहेत. वर्तमान भारतीय संसदेत महिलांचे समाधानकारक प्रतिनिधीत्व नाही. जोपर्यंत महिलांची ३३% आरक्षणाची व्यवस्था संसदेत होत नाही तोपर्यंत महिलांची स्थिती संशयास्पदच राहिल.

३३% महिला आरक्षण विधेयकात मागासवर्गातील महिलांना उप आरक्षण दयावे किंवा नाही हा सर्वात मोठया अडसर आहे. तसेच महिला आणखीन राजकीय कारभार सांभाळण्यास सक्षम बनल्या नसल्याचा स्वर पुढे येत आहे. त्यांना आणखीन शिक्षित व त्यांच्या राजकीय जाणीवा विकसित करण्याची आवश्यकता आहे. तसेच महिलांसाठी आरक्षणाची व्यवस्था एक प्रकारे वंश



Scanned by CamScanner

Degloor College, Degloor Dist.Nanded

परंपरेच्या राजकारणेस बढावा देईल. या विधेयकास संसदेच्या अधिवेशनात मनमोहन सिंह सरकारने मांडले. ४ मे २००५ ला साम्यवादी महिला नेता वृंदा करातने सुहासिनी अली (अध्यक्षा, अखिल भारतीय लोकतांत्रिक संघ) सोबत हे बिल पास करण्यासाठी पदयात्रा काढली. सुहासिनी अली या देशातील धैर्यहीन व कमकुवत महिलांचे प्रतिनिधीत्व करतात. वसाहतवादी काळातही महिलांच्या मतदान अधिकारास विरोध केला. यामागे तर्क असा होता की, महिला देशाच्या सुरक्षिततेसाठी उपयुक्त व सक्षम नाहीत. त्यामुळे मतदानाचा अधिकार हा त्यांचा जन्मसिध्द अधिकार नाही. ज्यामुळे घरगुती कामकाज हे त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनले. परंतु आज २१ व्या शतकात वरील चिंतन निरर्थक आहे. तसेच महिला आरक्षणाबाबत राजकीय पक्ष, राजकीय नेते, प्रसार माध्यमातील कांही प्रतिनिधी, सनातनी संघटना यांच्याकडून देण्यात येणारी मतमतांतरे निरर्थक ठरतात.

वर्तमान शासन, प्रशासन व समाज व्यवस्थेचा महिलांचे स्वातंत्र्य व मुक्ती हा अधिक चर्चेचा विषय आहे. तो शाश्वत विकासाचा एक पर्याय बनला. त्यामुळे १९८० च्या दशकात शासन पुरस्कृत अनेक चळवळी उदयास आल्या. राजस्थानमध्ये महिलांच्या विभिन्न गटामार्फत विभिन्न स्तरावर महिला विकास कार्यक्रम राबवले. यात ग्रामीण भागात पर्यवेक्षक, प्रचेता व इतर महिलांना १९९२ व १९९३ मध्ये संघटित करण्यात आले. या कार्यक्रमात कमीत कमी मजुरी, कार्याची स्थिती, नियुक्ती इ.शी संबंधीत विषयावर अहवाल तयार करण्यात आले. १९९५ ला कर्नाटककातील सहयोगिने एकत्रित बाल विकास सेवा, ऑंजलरी नर्स मिडवाइवस आणि कम्युनिटी हेल्थ विजिटर्स यात अधिकाधिक महिला होत्या. ज्यांना निम्न दर्जाच्या कामगारातील अस्वस्थतेला प्रदर्शित केले. याशिवाय अनेक राज्यांनी महिलांचा शहरी व ग्रामीण भागातील विकास बालकांचे कल्याणाशी संबंधित अनेक उपक्रम राबवले. परंतु शासनाच्या या सर्व उपक्रमाची एक मर्यादा असते. शासकीय उपक्रमाच्या आधारे ग्रामीण व शहरी भागातील अनेक महिला प्रस्थापित व्यवस्थेतील शोषणकारी प्रवृत्तींना विरोध केला. आपल्या हक्कांची मागणी केली. त्यातील बऱ्याच जणांना त्याचा त्रास सहन करावा लागला.

महिलापर्यंत शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने वसाहतवादीकाळात ए.आई.डब्ल्यूची स्थापना करण्यात आली. पुढील काळात या मार्फत महिलांच्या कल्याणीशी संबंधित सर्व प्रकारच्या मुद्यांना समाविष्ट करुन आपली व्याप्ती वाढवली. अशा प्रकारच्या हा पहिला प्रयत्न होता. आजही ही संस्था भारत शासनासाठी एक दबाव समूह म्हणुन काम करते. कालांतराने अशा अनेक संस्थाचा उदय झाला. ज्यांनी महिला चळवळीस एक संस्थात्मक रुप दिले. त्यास दैनंदिन जीवनाचा एक भाग मानले. यात सेवा (सेल्फ एम्प्लॉयड विमेन्स एसोसिएशन, १९७०), छत्तीसगड मानसुन श्रमिक संघ (१९७७), समग्र महिला स्वातंत्र्य, द फोरम विरुध्द बलात्कार (१९८१), विकासशील महिला संघटन, मानुषी (१९७७) इ.प्रमुख आहेत. १९७०-८० च्या दशकात कलकत्ता, पुणे, बेंगलोर इ. शहरी भागात महिलांच्या सहकार्याने अनेक पत्रक व नियतकालिके सुरु झाली. फेमिनिस्टनेटवर्क (मुंबई), बैजा (पुणे), अहल्या (कलकत्ता) सबला सचेतना, प्रतिवादी चेतना इ. कांही प्रमुख नियतकालिक आहेत. याशिवाय विमेन्स वॉइस, (बेंगलूर), स्त्री संघर्ष (पुणे) इ. प्रमुख पत्रिका आहेत.

आज भांडवली व्यवस्था जी अधिकाधिक नफा मिळवण्याचे धोरण आणि नव उदारमतवादी संरचना विरुध्दचा संघर्ष सर्वात महत्वाचा आहे. वाढती सैन्य स्पर्धा, युध्द हिंसा आणि साम्राज्यवादी शक्तीचा प्रहार वाढतो आहे. भारतात महिला आंदोलनाचे एक संघटित व सार्वभौमिक रुप स्पष्टपणे दिसत नाही. ते अनेक भागात विभागले आहे. कौटुंबिक हिंसा, यौन शोषण, बलात्कार, जबरस्तीचा बलात्कार इ.मुळे पर्यावरणीय व मानवी हक्काशी संबंधित आंदोलनास अनेक छटा आहेत. मागील कांही वर्षात भारतीय महिलात जागृती व सबलीकरणाचे लक्षण स्पष्ट जाणवतात. याची स्पष्ट जाणीव तेंव्हा झाली जेंव्हा नागपूर न्यायालयात घुसून ग्रामिण महिलांनी सामुहिकपणे गुन्हेगाराची हत्या केली. पोलिस आणि न्यायालयीन घटकांनी व यंत्रणेनी याकडे कायदा - व्यवस्थेविषयीचा आक्रोश म्हणुन पाहिले. याचे बारकाईने निरीक्षण करता ते महिला सबलीकरणास व्यक्त करते. जेसिका लाल हत्याकांड किंवा कोपर्डी यासारख्या अनेक प्रकरणात महिलांनी हिरहिरीने सहभाग नोंदवला. यामुळेच गुन्हेगारास शिक्षा झाली. याकामात प्रसार माध्यमांनीपण प्रशंसनीय भुमिका बजावली. अशाच प्रकारे देशाच्या वेगवेगळया भागात यौन- शोषण बलात्कारा विरुध्दचा वाढत्या प्रतिरोधाने प्रभावित होवूनच संसदेने यौन- शोषण व कौटुंबिक हिंसाचार तरतुदींना अधिक मजबुत केले. याशिवाय वरील कृत्याविरुध्दचा आवाज सर्वसामान्यापर्यंत पोहचावा म्हणुन महिलांनी उग्र मार्गाचा अवलंब केला. जे यापुर्वी दिसत नव्हते. उदा. हुंडापध्दतीमुळे ग्रस्त झालेली राजकोटमधील पुजा चौहान नावाची महिला अर्धनग्न होवुन रस्त्यावर उतरली. याठिकाणी पुजाने आपल्या शरिरावरीलच वस्त्र काढले. परंतु या कृत्याने तिने संपूर्ण समाजाचे नग्न चित्र लोकांसमोर व्यक्त केले. या घटनेने संपुर्ण देशात खळबळ माजली. सर्वसामान्य लोकांना याबाबत विचार करण्यास विवश केले. यापुर्वी मणिपूर येथील महिलांनी सैन्यामार्फत होणाऱ्या बलात्कार व यौन शोषणाविरुध्दचा आपला आवाज व्यक्त करण्यासाठी नग्न होवुन प्रदर्शन केले या घटनावरुन हे स्पष्ट होते की, महिला आपल्या शोषण व अन्यायाविरुध्द अधिक सक्रिय झाल्या. सरळ सरळ पितृसत्ताक व्यवस्थेला आव्हान दिले. पर्यावरणाशी संबंधीत चळवळीत महिलांनी हिरहिरीने सहभाग नोंदवला. सुनीता नारायण मार्फत पेप्सी व कोको कोलातील कीटकनाशकांचा पर्दाफाश केला. नर्मदा बचाओ आंदोलनात मेधा पाटकरांची भुमिका पश्चिम बंगालमधील सिंगूर येथील सेझ (SEZ) विषयी शासनाविरुध्द आवाज उठवणारी महाश्वेता देवी आणि मेधा पाटकरांची सक्रिय भुमिका ई.

२१ व्या शतक हे महिलांचे शतक आहे. तरीही महिलांच्या जीवन जगण्यावर प्रश्न चिन्ह निर्माण करणारे अनेक संकट पावलोपावली



Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

आहेत. भारतीय संस्कृतीने स्त्रिविषयीची रेखाटलेली चाकोरीबध्द जीवनशैली, पावित्र्य, प्रतिष्ठेचे चित्रच महिला आंदोलनातील सर्वात मोठी अडचण आहे. भारतात स्त्रिवाद ही आयात केलेली विचारसरणी म्हणुन ओळखली जाते. परंतु या विधानात कांही सत्यांश नाही. कारण वर्तमान स्त्रिवादाशी संबंधित अनेक आयामांना महात्मा गौतम बुध्द व महात्मा बसवेश्वरांनी सैध्दांतिक आधार देवुन त्यास व्यवहार्यता दिली. एकंदरीत स्त्रिवाद किंवा महिला सबलीकरणाचा विचार भारतीय प्राचीन संस्कृती विरोधी आहे. त्यामुळे भारतीय समाजाकडून स्त्रिवाद शब्दास नकारात्मक पाठींबा व दृष्टिकोनाचा आधार मिळाला. सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने विचार करता स्त्रिवाद म्हणजे एक स्वैराचारी स्त्रिचे चित्र होय. ज्यांचे कौटुंबिक आयुष्य सुखी व समाधानाचे नाही तेच स्त्रिवादी समजले जातात. यांच्यामते अशा महिला दुसऱ्या घरातील महिलांनाही प्रोत्साहित करुन दुसऱ्याचे घर तोडण्याचा प्रयत्न करतात. त्या आपल्या कुटुंबातील सदस्याची निगा राखत नाहीत. आपल्या कौटुंबीक जबाबदाऱ्या व कर्तव्याचे निर्वाहन करत नाहीत. अशा प्रकारे पुरुषांसाठी स्त्रिवाद हा विनोदाचा विषय बनला. तसेच तो भारतीय समाजातला अव्यवहार्य सिध्दांत असल्याचे मत ही कांहींनी नोंदवले.

वर्तमान भारतात स्त्रिवादी आंदोलनाची सैध्दांतिक दिशा मांडणाऱ्या महिला पश्चिमेकडून शिक्षण घेतलेल्या आहेत. तसेच या समाजातील मोठया घराण्यातील आहे. त्या फार मोठया व प्रसिध्द संघटनांच्या महत्वाच्या पदावर आहे. परकीय मदतीस मिळवण्यासाठी त्यांच्याकडे एक सामाजिक भांडवल आहे. त्यामुळे सर्वसामान्य महिला आपल्या अनुभवास या स्त्रिवादी महिलेशी जोडून मांडणी करु शकत नाही. या समाजातील वरच्या वर्गातील पद परंपरेत राहण्याच्या गुलाम झालेल्या असतात. तेथेपर्यंत पोहचण्याची ताकत सर्वसामान्य महिलेची नसते. त्यामुळे या महिलेला भिती वाटते की, जर आपण त्यांना मदत केली तर आपले सर्वस्व गमावू या स्त्रिवादी विचारधारेच्या महिलाचा उद्देश पूर्ण होताच त्या आपल्याला दुर लोटतील अशा सामाजिक व कौटूंबिक विश्वास गमावलेल्या अवस्थेत आपण कुठे जावे या चिंतेने या महिला ग्रासलेल्या असतात. तिला समाज बहिष्कृत करतो. महिलांसाठी काम करणारी सामाजिक कार्यकर्ती आम आदमीपासून दुरच रहाते. बऱ्याच स्त्रिवादी महिलांचे ध्येय लोकांच्या समस्या समजुन घेवून त्या शासन दरबारी मांडून सोडवण्याचे नसते तर स्वतःचे करियर बनवण्याचे असते. भारतीय महिलांच्या गरीबीला लोकांसमोर आणण्यात स्त्रीवादयाचा स्वार्थ दडलेला आहे. याशिवाय कांही स्त्रीवादी शासकीय सेवेतील आहेत. जे शासकीय अनुदान प्राप्त योजनांचे संचलन करतात. ज्यातुन त्यांना जीवन जगण्यापुरती मिळकत होते. त्यामुळे ते शासनाकडून बनवलेल्या कोणत्याही पितृसत्ताक व शोषणदायी धोरणाविषयी मौन बाळगतात. भारतीय महिलामध्ये आपल्या कुटुंबाविरुध्द जाण्याचे धाडस नाही. आपल्या कुटुंबाविरुध्द आवाज उठवल्याने स्वतःवर जो सामाजिक अप्रतिष्ठेचा शिक्का लागतो. त्यामुळे त्यांचे जीवन अधिक दुःखमय बनते. त्यामुळे त्या स्वतःच स्वतःला पुरुषाची संपत्ती समजतात. सीमोनदी बुआच्या मते - नीग्रो , यहुदी आणि सर्वहारा वर्गातील सर्व आपणास आम्ही लोक या स्वरुपात संबोधतात. परंतु महिला असे करण्यासाठी संघटित नाहीत. पुरुष त्यांना बाईमाणुस याच नावाने संबोधतात. कारण महिला स्वतःस एक वर्ग किंवा वेगळया श्रेणीत पाहु शकत नाहीत. त्यास स्वतःस आपले वडील किंवा नवऱ्याच्या प्रतिष्ठेशी जोडतात. अशा परिस्थितीत त्या आपल्या अधिकाराबातही जागरुक नसतात. त्यांना कुटूंबात जे कांही मिळते ते त्यातच राहतात. कारण की हे सर्व सटवीने आपल्या नशिबात लिहिले आहे. एका दिवसी दैवीन्यायाचा प्रकाश त्यांच्यावर पडेल. सर्व प्रकारच्या दुःखातून त्यांची मुक्तता होईल. या आशेने त्या सर्व सहन करतात. दैवी न्यायाचा सिध्दांत हा त्यांच्या शक्ती व एकत्रीकरणात आहे हे त्या समजून घेत नाहीत. फक्त त्यास परस्पराशी जोडण्याची गरज आहे. महिलांनी स्वतःच्या नावास पति व वडीलांच्या नावापासुन वेगळे करावे. स्वतःस एक स्वतंत्र व्यक्ति समजावे ज्याकडे आकाशाला गवसणी घालण्याची क्षमता आहे.

संदर्भ ग्रंथ :

१) महिला सक्षमीकरण - स्वरुप आणि विकास - संपादक - प्रा.पांडूरंग मुद्दे अरुणा प्रकाशन लातूर - २०१६

२) भारतीय नारी के उध्दारक डॉ.बी.आर.आंबेडकर - डॉ.कुसूम मेघवाल सम्यक प्रकाशन - २००५

३) फुले आंबेडकरी स्त्री चळवळ - मीनाक्षीमून - समता प्रकाशन, नागपूर २०११

४) हिंदू संस्कृती आणि स्त्री - आ.ह.साळुंखे - लोकवाङःमय गृह - २००८

५) भारतीय समाज - श्यामाचरण दुबे - अनुवाद - वंदनामिष्य - नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया २००८

६) महात्मा फुले समग्र वाङःमय - संपादक - श्री धनंजय थोर - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई - २००६

७) महिला सक्षमीकरण - समस्या आणि उपाय - प्रा.डॉ.सौ.रेखा हिंगोले (माने) इशा प्रकाशन - लातूर - २००६

८) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री सुधारणा - संपादन दिलीप सुरवाडे - लोकसाहित्य प्रकाशन - औरंगाबाद - २००९

९) संतसाहित्य आणि समाजप्रबोधन - संपादन - प्राचार्य रा.तु.भगत, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.पुणे - २००५

१०) संत साहित्य अभ्यासाच्या काही दिशा - संपादक डॉ.कल्याण काळे, रा.श.नगरकर, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे - १९९२

११) Democrasy in India - Chander Prakash Bhambhari - National Book, Pust India - २००७

१२) गांधी नेहरु आंबेडकर सामाजिक न्याय एवं राजनीति - कान्ता मीणा एवं हेमराज मीणा, आदि पब्लिकेशन्स जयपूर, २०११

❑❑❑



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner